# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

---

**दिनांक ०५.०८.२०२६ बुधवार**

**१) मा. न्यायालयातुन आरोपीला आजन्म कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०५.०८.२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोर्ट क्र. १९, नागपुर, श्री. विनय मुगलिकर साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ३२२/२०१८ मधील, पोलीस ठाणे एमआयडीसी येथील अप. क्र. ८९/२०१८ कलम ३०२,३०७,५०६ ब भादंवि या गुन्ह्यातील आरोपी सचिन पुरूषोत्तम पेंदोर, वय २८ वर्षे, रा. दाते ले—आऊट बाबरे यांचे नविन घराचे बांधकाम साईटवर, जयताळा, एमआयडीसी, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३०२ भादंवि कायद्यान्वये आजन्म कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ६ महिने अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा तसेच, कलम ३०७ भादंवि कायद्यान्वये १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ३,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महिने अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली.**

फिर्यादी सौ. संगिता खेमलाल परते वय ३८ वर्षे, रा. रा. दाते ले—आऊट बाबरे यांचे नविन घराचे बांधकाम साईटवर, जयताळा, एमआयडीसी, नागपूर यांची मुलगी सौ. गितेश्वरी चंद्रकुमार मडावी वय २२ वर्षे, रा. चंद्रपूर हिचे पतीसोबत दारू पिण्याचे कारणावरून वादविवाद व मारपीट होत असल्याने ती आपल्या आई—वडीलांकडे घटनास्थळी हल्ली मुक्कामी पत्यावर राहत होती. बांधकाम साईटवर तिचे प्रेम संबंध आरोपीसोबत जुळले. आरोपी हा सुध्दा दारू पिण्याचा सवईचा होता. तसेच तो तिला शिवीगाळ व मारहाण करायचा. त्यामुळे तिचा पती तिला घेवून जाण्याकरीता आला असता, नमुद आरोपी याने मनात राग धरून दिनांक १२.०३.२०१८ चे ०३.०० वा. चे सुमारास, दाते ले—आऊट बाबरे यांचे नविन घराचे बांधकाम साईट येथे लोखंडी टिकासने गितेश्वरी हिच्या डोक्यावर मारून तिला जागीच जिवानिशी ठार करून तिच्या पतीला गंभीर केले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक १६.०३.२०१८ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोउपनि. मदनकर यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री रविंद्र भोयर यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री एन. टी. नकाशे यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. नितीन सिरसाट व नापोअं. गुरूदास ताडपल्लीवार यांनी काम पाहिले

**२) मा. अपर पोलीस आयुक्त दक्षिण/उत्तर प्रभाग कार्यालय येथे गुन्हेगारांचा आदान—प्रदान कार्यक्रम संपन्न :—**

अ) मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन दिनांक ०५.०८.२०२६ रोजी, सकाळी १०.०० वा. नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे तसेच, गुन्हेशाखा येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण ६० अटक आरोपींचे आदान—प्रदान हे अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय येथे पार पडले. आदान—प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस

अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, श्री. वसंत परदेशी, मा. सहायक पोलीस आयुक्त श्री नरेंद्र हिवरे, श्री रोहित ओव्हाळ, श्री रोशन पंडीत व श्री यशवंत नलावडे हे उपस्थित होते. तसेच आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील १७ अधिकारी व ३६ अंमलदार हे आरोपींसह हजर होते.

मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण विभाग) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली बाबत उपस्थीत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समजावुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचे डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा सुचना दिल्या.




ब) मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन दिनांक ०५.०८.२०२६ रोजी, सकाळी १०.३० वा. नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे तसेच, गुन्हेशाखा येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण ५१ अटक आरोपींचे आदान–प्रदान हे पोलीस मुख्यालय परिसरातील अलंकार सभागृह येथे पार पडले. आदान–प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग, श्रीमती विनीता शाहु, मा. श्री वैभव जाधव, सपोआ (गुन्हे) तसेच सहायक पोलीस आयुक्त श्री सुनिलसिंग पवार, श्री राजेश तटकरे, श्री शिवप्रसाद पारवे, श्री अंकुश खेडकर, श्री सत्यवीर बंडीवार हे उपस्थित होते. तसेच आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत १७ पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील एकुण ४१ अधिकारी व अंमलदार हे आरोपींसह हजर होते.

मा. अपर पोलीस आयुक्त (उत्तर विभाग) यांनी आरोपींचे डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती संकलित करावी व अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा सुचना दिल्या.

**३) परिमंडळ क्र.०१ अंतर्गत गुन्ह्यातील किंमती मुद्देमाल मुळ मालकांना परतः नागरीकांनी व्यक्त केला समाधानाचा भाव.**

नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत, परिमंडळ क्र. ०१ मधील पोलीस ठाणे वाडी, एमआयडीसी, राणाप्रतापनगर,बजाजनगर,सोनेगाव व हिंगणा येथे दाखल वेगवेगळ्या गुन्ह्यांमधील चोरीस गेलेला किमती मुद्देमाल एकुण १३७ मोबाईल किंमती १७,६१,०००/– रु. चे व २२ वाहने अंदाजे कि. १०,०६,०००/– तसेच इतर किमती मुद्येमाल ५३,९६,३८१/– रु. असा एकुण ८१,६३,३८१/– रु. चा मुद्येमाल त्यांचे मुळ मालकांना परत

करण्याचा कार्यक्रम दिनांक ०५.०८.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग व श्री सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी यांचे प्रमुख उपस्थितीत परिमंडळ क्र. ०१ कार्यालय येथे संपन्न झाला.

नागरिकांना मुद्येमाल परत करण्याची कार्यवाही मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर तसेच मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर व मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली पार पाडण्यात आली. मुद्देमाल परत करण्याचे कार्यक्रमास परिमंडळ ०१ मधील सहायक पोलीस आयुक्त श्री यशवंत नलावडे तसेच सर्व सहा पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक व परिमंडळ क्र. ०१ कार्यालयातील वाचक, अंमलदार आणि ८० नागरिक हजर होते. मुद्देमाल परत मिळालेले नागरिकांनी कार्यक्रमाबाबत सकारात्मक मनोगत व्यक्त करून पोलीसांचे कामाप्रति समाधान व्यक्त केले. सदर कार्यक्रमात नागपूर पोलीसांतर्फे आवाहन करण्यात आले की, नागरिकांनी हरविलेले/चोरीस गेले फोनबाबत सीईआयआर पोर्टलवर तात्काळ नोंदणी करून मोबाईलचा गैरवापर टाळण्याकरीता मोबाईल ब्लॉक करावेत. मोटारसायकल/ईतर वाहन/किंमती मुद्देमाल चोरी गेल्यास नजीकचे पोलीस ठाणे येथे तसेच डायल ११२ वर कळवावे. सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या क्रमांकावर माहिती/तक्रार नोंदवावी.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे लकडगंज :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०४.०८.२०२६ चे १७.२५ वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत जुनी मंगळवारी परिसरात पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, ईरफान पान ठेल्याजवळ, गंगाजमुना वस्ती येथे एक इसम संशयास्पद स्थितीत दिसल्याने, त्यास आवाज दिला असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव इशु रवि सोनटक्के वय २२ वर्षे रा. राजू पटेल यांच्या घरी किरायाने, धरमपेठ, गवळीपूरा, सिताबर्डी, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे नेस्ते पॅन्टचे कंमरेत एक फोल्डींगवाला लाखंडी चाकू मिळून आल्याने किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे पोहवा. सतिश निमजे यांचे तक्रारीवरून

आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे पाचपावली</u> :—** दिनांक ०५.०८.२०२६ चे १०.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, ग्लोबल फर्निचर दुकानचे बाजुला, गजभिये गोडाऊन दुकान समोर, मोहम्मद रफी चौक, एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३० ते ४० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन—डोक्याचे केस— काळे—पांढरे व वाढलेले, अंगात—ग्रे रंगाचे टि—शर्ट व काळ्या रंगाचा फुल पॅन्ट, पायात पांढरे जोडे तसेच गळ्यात हिरव्या व लाल रंगाचा दुप्पट्टा घातलेला आहे. वर्णनावरून मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे संपर्क साधावा.

यापकरणी फिर्यादी युवराज श्रावण कोसे वय ४५ वर्षे, रा. प्रेम नगर, झेंडा चौक, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. कृष्णा पुल्लेवार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| **१.** | मा. १५ वे सह दिवाणी न्यायाधीश क—स्तर तथा प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, नागपुर. | ३०२२५४/२०११ | कलम ४९८(अ), ३४,३२३, ५०४ भा.दं. वि. | शुभांगी कांबळे रा. कोराडी कर्मचारी वसाहत हाईप ५, बी. नं. २१ कॉटर नं. २, कोराडी रोड नागपूर | ०७.०८.२०२६ |
| **२.** | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ६, नागपूर | ३०८०००८/२००० | कलम ३२४,३४ भादंवि | १)शिवरामसिंग जोगीलालसिंग बादल (बाथम) २) सुखरामसिंग जोगीलालसिंग बादल दोन्ही रा. गोस्वामीचे घरी किरायाने, गितानगर, झिंगाबाई टाकळी, नागपूर | ०७.०८.२०२६ |
| **३.** | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ६, नागपूर | ३०८०२७७/१९९९ | कलम ४५४,४३०, ४११,३४ भादंवि | १)प्रविण रामचंद्र चोनडे रा. इंदीरागांधी झोपडपट्टी, एमआयडीसी, नागपूर २) ज्ञानेश्वर मधुकर मोहाडीकर रा. सोनेचांदी व्यापारीचे दुकान, केळीबाग रोड, महाल, कोतवाली, नागपूर ३) सोनु उर्फ काल्या बैसवारी | ०७.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | रा. इमामवाडा, रामबाग झोपडपट्टी, नागपूर | |
| ४. | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ६, नागपूर | ३०८०३१५ /१९९८ | कलम ४५२,४४८, २९४, ५०६ ब भादंवि | १)पटेल पेरुयक सेठी रा. पोलीस लाईन टाकळी, स्वीपर लाला लाईन, सदर, नागपूर<br>२) नंदु समतराव नितनवरे रा. झिंगाबाई टाकळी, बुध्द विहाराजवळ, कोराडी, नागपूर<br>३) संतोष गोवर्धन कश्यप रा. राजनगर झोपडपट्टी, पागलखाना, सदर, नागपूर | ०७.०८.२०२६ |
| ५. | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ६, नागपूर | ३०८०२६६ /१९९८ | कलम ४९८ अ भादंवि | १)अशोक सुर्यभानजी जामगडे रा. गोरेवाडा, रमाबाईचे घरी किरायाने, कोराडी, नागपूर पागलखाना, सदर, नागपूर | ०७.०८.२०२६ |
| ६. | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ६, नागपूर | ३०८०३०० /१९९९ | कलम ३९२ भादंवि | राजु उर्फ जॅक्सन अंतुजी बोरकर रा. झिंगाबाई टाकळी, मुकाबाबा देवळाजवळ, कोराडी, नागपूर | ०७.०८.२०२६ |
| ७. | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ६, नागपूर | ३०८००४६ /२००४ | कलम ४५७,३८० भादंवि | रुपेश उर्फ रुप्या ज्ञानदास मेश्राम रा. जयभिमनगर, पोलीस चौकी माग, कोराडी, नागपूर | ०७.०८.२०२६ |
| ७. | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ६, नागपूर | ३०८००५५ /२००० | कलम ४५२,३५४, ५०६ ब भादंवि | महेंद्र उदराम मेश्राम रा. ऐरीगेशन कॉलनी, श्रीवास नगर, महादुला, कोराडी नागपूर | ०७.०८.२०२६ |
| ८. | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ६, नागपूर | ३०८०३३३ /१९९८ | कलम ४५७,३८०,३४ भादंवि | १) रहीम खान सुभेदार खान रा. महादुला मस्जिदजवळ, कोराडी, नागपूर<br>२) मुकद्दर खान मजीद खान रा. श्रीवास नगर, महादुला झोपडपट्टी, कोराडी नागपूर | ०७.०८.२०२६ |
| ९. | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ६, नागपूर | ३०८०४१२ /१९९८ | कलम ३७९,१०९, ११४,१२० ब भादंवि | १) नरेंश देवलाल बोतचे रा. श्रीवास नगर, महादुला झोपडपट्टी, कोराडी नागपूर<br>२) चरणदास सुर्यभान चिमुरकर(चिमणकर) रा. सिरसपेठ, मट्टीपुरा, आखाडया जवळ, इमामवाडा, नागपूर<br>३) सुधाकर गोमाजी जांभुळे रा. श्रीवास नगर, झोपडपट्टी, कोराडी, नागपूर<br>४) शिवकुमार रामचंद्र तिवारी | ०७.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | रा. प्लॉट क्र. ३२, झिंगाबाई टाकळी, कोराडी, नागपूर | |
| **१०.** | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ६, नागपूर | ३०८०३६५ /१९९९ | कलम ३७९, ३४ भादंवि | १) संजय उर्फ संजु बाबुराव पोहरे जैन रा. चंदननगर, मेडीकल चौक, शंकरराव चव्हाण यांचे घरी, नागपूर<br>२) गुडडु उर्फ जितेंद्र धर्मदास वर्मा रा. गोपालनगर, दुसरा बस स्टॉप, प्लॉट क्र. ३८, प्रतापनगर, नागपूर | ०७.०८.२०२६ |
| **११.** | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ६, नागपूर | ३०८०२२८ /१९९७ | कलम ३७९ भादंवि | १) प्रविण प्रभाकरराव उडाणशिव रा. केटीपीएस कॉलनी, टाईप ४/२६/१०४, कोराडी, नागपूर<br>२) मनोज दानी गौर<br>३) राजु प्रेमलाल भालेराव दोन्ही रा. महादुला मच्छीबजार झोपडपट्टी, कोराडी, नागपूर | ०७.०८.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**